सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत,आरोग्य सेवा आयुक्तालय यांचे अखत्यारीतील गट-क व ड संवर्गातील सरळसेवा भरती २०२३

.........................................................................................................

दिनांक ०२.०२.२०२४

## प्रसिध्दीपत्रक

विषय - गुणवत्ता व निवड यादी प्रसिध्द करणेबाबत.

आरोग्य सेवा आयुक्तालय अंतर्गत गट-क व ड संवर्गातील ऑनलाईन दिनांक ३०/११/२०२३ ते ०७/१२/२०२३ व दिनांक १२/१२/२०२३ या तारखांना आयोजित करण्यात आलेली होती.

१) ऑनलाईन परिक्षेअंती मे.टिसीएस-आयओएन यांनी गट-क संवर्गातील खालील १० पदांची निवड यादी, प्रतिक्षा यादी व गुणानुक्रमे प्राप्त गुणांची यादी सादर केली आहे. त्यानुसार अंतरिम निवड यादी, प्रतिक्षा यादी व गुणानुक्रमे प्राप्त गुणांची यादी याव्दारे प्रसिध्द करण्यात येत असून, त्यामध्ये नियमानुसार आवश्यक ते बदल करण्याचे सर्व अधिकार विभागास राहतील व त्यानुषंगाने कोणाचाही दाव्याचा विचार करण्यात येणार नाही.

| अक्र. | पदनाम |
|---|---|
| १ | आहारतज्ञ |
| २ | कनिष्ठ अवेक्षक |
| ३ | मोल्डरुम तंत्रज्ञ / रेडीओग्राफी तंत्रज्ञ |
| ४ | नळ कारागीर |
| ५ | वरिष्ठ सुरक्षा सहायक |
| ६ | दंत आरोग्यक |
| ७ | कनिष्ठ तांत्रिक सहायक (एचईएमआर) |
| ८ | हिस्टोपॅथी तंत्रज्ञ |
| ९ | गृह नि वस्त्रपाल |
| १० | ग्रंथपाल |

www.mygovnaukari.com

२) प्रस्तूत अंतरिम निवड यादी व प्रतिक्षा यादीमध्ये १ : २ या प्रमाणे प्रतिक्षा यादीवर उमेदवार घेण्यात आले असून, सदरील तिन्ही उमेदवार कोणत्याही कारणास्तव नियुक्तीस अपात्र ठरल्यास गुणानुक्रमे प्राप्त गुणांच्या यादीतून पुढील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.

३) या अंतरिम निवड यादी व प्रतिक्षा यादीमध्ये जाहिरातीमधील नमुद मुद्दा क्र. ९ नुसार परिक्षेच्या एकुण गुणाच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांचाच विचार करण्यात आलेला आहे.

४) अंतरिम निवड यादीतील उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करुन नियुक्ती देण्याचे वेळापत्रक विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**आरोग्य सेवा आयुक्तालय**

www.mygovnaukari.com